# पुणे विद्यापीठ

सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ

**विद्यार्थी कल्याण मंडळ**

**डॉ. पंडीत एन. शेळके**

एम.एस.सी., पी.एच.डी.

संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ


संदर्भ क्र.: विकमं/२०१२–१३/७५८ दिनांक : ३१/०१/२०१३.

प्रति,

**मा. प्राचार्य / मा. संचालक/ मा. विभागप्रमुख,**
पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.
पुणे विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर विभाग.

**विषयः– 'स्त्री–भ्रुण हत्या : जनजागृती' राज्यस्तरीय दोन दिवसीय कार्यशाळेबाबत.....**

महोदय/महोदया,

पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ व रयत शिक्षण संस्थेचे, महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी, पुणे ४११ ०१७ यांचे संयुक्त **विद्यमाने दि. १६ व १७ फेब्रुवारी, २०१३ रोजी ' स्त्री–भ्रुण हत्या : जनजागृती'** राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील/विद्यापीठांतील पदव्युत्तर विभागांतील **०५ मुली व ०५ मुले असे एकूण १० विद्यार्थ्यांना १६ फेब्रुवारी, २०१३ रोजी सकाळी ०९.०० ते १०.००** या वेळेत स्त्री–भ्रुण हत्या : जनजागृती कार्यशाळेत सहभागी होणेबाबत सूचित करावे व सदर पत्र आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील/विद्यापीठांतील पदव्युत्तर विभागाच्या सूचना फलकांवर प्रदर्शित करावे, ही विनंती.

कळावे,

**सोबत : महाविद्यालयाचे पत्र.**

३१/१/१३

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

# महात्मा फुले महाविद्यालय

पिंपरी, पुणे – ४११ ०१७.

कला, वाणिज्य व विज्ञान (मराठी व इंग्रजी)

NAAC Re-accredited : 'A' Grade

पुणे विद्यापीठ नोंदणी क्रमांक : आय.डी.पी./पी.एन.ए.सी.एस./०५३-(१९८३)

डॉ. ए. डी. आंधळे
एम्.एस्सी., पी.एचडी.
प्राचार्य

कार्यालय : (०२०) २७४१२००७
प्राचार्य फोन : (०२०) २५४४२४०५
प्राचार्य मो. : ९८८१२३५२२४
फॅक्स : (०२०) २७४१२००७

संस्थापक : पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील


संदर्भ क्रमांक : ११८५/२०१२-२०१३ दिनांक : २९/१/२०१३

प्रति,
मा. संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ,
पुणे विद्यापीठ, पुणे.

विद्यार्थी कल्याण मंडळ
आवक/जावक क्र.: 2596
दिनांक :- 30/1/13
शाखा :- S-W.

विषय : " स्त्रीभ्रूण हत्या : जनजागृती " दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेत विद्यार्थ्यांचा सहभाग वाढण्यासाठी विविध महाविद्यालयांना कळविण्याबाबत.

महोदय,

या महाविद्यालयातील ' महिला मंच ' व पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाच्या संयुक्त विद्यमाने दि. १६ व १७ फेब्रुवारी २०१३ रोजी " स्त्रीभ्रूण हत्या : जनजागृती " या विषयावर दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित केली आहे. सदर कार्यशाळेत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातून सुमारे ५०० विद्यार्थी-विद्यार्थिनींचा सहभाग व्हावा असे आमचे प्रयत्न आहेत व तशी व्यवस्थाही आम्ही केलेली आहे. रजिस्ट्रेशन सकाळी ८ ते १० या वेळेत आहे.

आजच्या ढासळत्या सामाजिक व्यवस्थेतून समाजाला बाहेर काढण्या करीता युवकामध्ये जागृती व्हावी या उद्देशाने आम्ही त्यांना मार्गदर्शन करण्याकरिता अतिशय तज्ञ व समाज व्यवस्थेची जाणीव असणा-या वक्त्यांची व्याख्याने आयोजित केलेली आहेत. तरी आमच्या प्रयत्नांना यश येण्या करिता आपले सहकार्य अपेक्षित आहे. त्याकरिता आपण आपल्या विभागामार्फत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील ०५ मुली व ०५ मुले असे एकूण १० विद्यार्थी सहभागी व्हावेत असे पत्र व एस.एम.एस. पाठवावेत अशी नम्र विनंती.

कळावे,

आपले विश्वासू,

प्रा. डॉ. भारती यादव
चेअरमन
महिला मंच समिती

प्राचार्य,
महात्मा फुले महाविद्यालय
पिंपरी, पुणे -१७.

सोबत - कार्यक्रम पत्रिका पाठवीत आहोत.

संपर्क सूत्र - १) प्रा. डॉ. भारती यादव - मो. न. ९८६०६४५६७४
२) प्रा. डॉ. पष्पा अर्कसाली - मो. न. ९८२३३१३४३५